कोल्हापूर
मंगळवार
दि. 05 मे 2026
RNI NO. MHMAR/25/A4580

# हॅलो प्रभात

कोल्हापूर आवृत्ती

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर



▪ वर्ष : ०१ ▪ अंक : ९० ▪ मंगळवार, ०५ मे २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या ‘कॉरिडॉर’ला विरोध!

## स्थानिक जनतेशी संवाद साधूनच निर्णय घेणार : पालकमंत्री

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत प्रस्तावित नवीन व्याघ्र मार्गिका (कॉरिडॉर) च्या नियोजनात स्थानिक नागरिकांना आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता निर्णय घेणे अन्यायकारक असून, या नवीन सीमांकनामुळे स्थानिकांच्या विकासावर गदा येणार आहे. दोन वर्षापूर्वी हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर, वन्यजीव विभागाच्या प्रस्तावित कॉरिडॉरबाबत तातडीने स्थानिक जनतेचे आणि लोकप्रतिनिधींचे म्हणणे वन विभाग तसेच भारत सरकारच्या संबंधित मंत्रालयाला कळविण्याचे स्पष्ट निर्देश कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. तसेच हा प्रस्ताव मान्य नसलेबाबत राज्याचे मुख्यमंत्री तसेच वनमंत्री यांच्याकडेही आम्ही मागणी करणार असल्याचे पालकमंत्री श्री. आबिटकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष आढावा बैठकीत सांगितले.

या प्रकल्पामुळे कोल्हापूरसह लगतच्या जिल्ह्यातील ५५० हून अधिक गावांवर निर्बंध येण्याची शक्यता असल्याने, आधीच वन्य प्राण्यांच्या त्रासाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिक भर पडणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले. कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी करताना स्थानिकांना प्रक्रियेत सामावून घेणे आणि त्यांच्याशी सल्लामसलत करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.



या महत्त्वपूर्ण बैठकीस खासदार शाहू छत्रपती, खासदार धैर्यशील माने, आमदार विनय कोरे, आमदार शिवाजी पाटील, जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कोल्हापूर श्रीमती श्रीलक्ष्मी अन्नाबथुला, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, क्षेत्रिय संचालक सह्याद्री व्याघ्र प्रकल्प तुषार चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव व इतर संबंधित अधिकारी प्रत्यक्ष तर राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, कोयना वन्यजीव विभागाचे उपसंचालक आणि महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हे ऑनलाइन प्रणालीद्वारे उपस्थित होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले, प्रकल्प राबविताना पारदर्शकता महत्त्वाची असून, निर्बंधांची पूर्वकल्पना न देता निर्णय घेणे लोकशाहीला धरून नाही. अनेक वर्षांपासून या दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांचे जीवन आधीच संघर्षाचे असून, नवीन कॉरिडॉरमुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि मूलभूत अधिकारांवर कडक निर्बंध लादले जातील. या बैठकीस उपस्थित असलेले खासदार शाहू छत्रपती यांनी नागरिकांच्या हक्कांवर गदा येत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. त्याचप्रमाणे, खासदार धैर्यशील माने यांनी या प्रकल्पाचा तांत्रिक आराखडा आणि भौगोलिक व्याप्ती यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. स्थानिकांचा रोष लक्षात घेता, प्रशासनाने केवळ आराखडे न बनवता प्रत्यक्ष जमिनीवरील वस्तुस्थितीचा विचार करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. विकास प्रक्रियेत स्थानिकांचा सहभाग अनिवार्य असून त्यांच्या विरोधात जाणारा कोणताही निर्णय लादला जाऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार स्तरावरील लोकप्रतिनिधींनी देखील या नियोजनातील त्रुटींवर मत व्यक्त केले. आमदार विनय कोरे यांनी सांगितले की, व्याघ्र प्रकल्पाच्या नवीन सीमांकनाबाबत ठराव घेऊन संबंधित विभागाकडे देणे आवश्यक आहे. आमदार शिवाजी पाटील यांनी या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करताना सांगितले की, प्रकल्पाची माहिती गुप्त ठेवल्यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने स्थानिकांच्या हिताचे रक्षण करणे आवश्यक असून, केवळ निर्बंधांची लादणूक करण्यापेक्षा सहअस्तित्वाचा विचार करावा, असे त्यांनी सुचवले.

## संक्षिप्त...

### लिंबु-मिरचीचा अघोरी प्रकार उघड

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोनोली पैकी फालेवाडा येथे सुरज फाले या युवकाचा खुन झाला. खुनाच्या घटनेवेळी एका चार चाकी गाडीत पोलिसांना ३ बंदुका मिळून आल्या असल्याने बाजारीवाडा परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. त्यातच रविवारी (दि.३) रात्री बाजारीवाडा फाट्यावरील तिकटीवर अज्ञाताने लिंबु मिरचीचा अघोरी प्रकार केल्याने परिसरात पुन्हा खळबळ उडाली आहे.

### शक्तिपीठ महामार्गाविरोधात पुन्हा संघर्ष

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाविरोधात करवीर तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. गावागावांत बैठका घेऊन आंदोलनाची रणनीती आखली जात आहे. जमीन संपादन प्रक्रियेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत कोणत्याही परिस्थितीत जमीन देणार नाही, असा ठाम निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. गावात ५ ते १५ गुंठ्यांपर्यंतचे शेतकरी आहेत. त्यांची जमीन गेली तर कुटुंबाने जगायचे कसे? ग्रामसभेत शक्तिपीठविरोधात ठराव केला आहे.

### डीपी जळण्याचे प्रकार वाढले

**सातारा : हॅलो प्रभात**

सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी विजेची आवश्यकता आहे, मात्र विजेच्या प्रचंड दाबामुळे विद्युत ट्रॉन्सफार्मर जळण्याचे प्रकार घडत आहेत. नवीन डीपी बसवण्यासाठी बराच कालावधी जात आहे. महावितरणच्या या घोळात शेतकऱ्यांची पिके जळून जात असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

### सोलापूर जिल्ह्याला ८४२ कोटींचा निधी

**सोलापूर : हॅलो प्रभात**

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७८३ कोटी निधी मंजूर होता. या सर्व निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे घेण्यात आलेली असून १०० टक्के निधी खर्च झाला आहे. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ८४२ कोटी निधी मंजूर आहे. या निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कामे हाती घेता येतील, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

## जत शहर स्वच्छ, सुंदर बनविणार : नगरसेवक मोरे

**जत : हॅलो प्रभात**



जत शहरातील विठ्ठलनगर पश्चिम भाग येथे जागर फाउंडेशनच्या वतीने नुकतीच विशेष स्वच्छता मोहीम उत्साहात पार पडली. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली असून, आगामी काळात शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये अशाच प्रकारे स्वच्छतेचा जागर केला जाणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन जागर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष परशुराम मोरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या सूचनेनुसार जत शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. स्वच्छतेची ही चळवळ आता प्रत्येक प्रभागात राबवली जाईल,असे मत नगरसेवक परशुराम मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

या मोहिमेला जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले. नगरपरिषदेचे कर्मचारी आणि फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिसरात साचलेला कचरा हटवून परिसर चकाचक केला.यावेळी जागर फाउंडेशनचे अध्यक्ष मच्छिंद्र जतकर, सचिव सिद्धू जाधव, तसेच नगरसेवक राजकुमार साळे, अवी साळे, विशाल पाथरूट, सागर मोरे, अजित भिसे, आनंद कांबळे, प्रसाद शिंदे आणि नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. जागर फाउंडेशनच्या या सामाजिक कार्याचे विठ्ठलनगरमधील नागरिकांकडून मोठे कौतुक होत आहे.

## पेठनाका येथे ‘भाजप’ने केला विजयाचा जल्लोष

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगाल, आसाम व पुदुच्चेरी (पंडिचेरी) राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भरघोस यश संपादन केल्याबद्दल भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ नाका येथे जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी पेढे वाटून तसेच फटाक्यांची आतषबाजी करत विजयाचा आनंद व्यक्त केला. यावेळी बोलताना महाडिक म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगाल, आसाम व पुदुच्चेरी येथे मिळवलेले यश हे अत्यंत दैदिप्यमान आहे. पश्चिम बंगालमध्ये दीर्घकाळ चालत आलेले ममता सरकार आता संपुष्टात आले असून येथे भारतीय जनता पार्टीचा झेंडा अभिमानाने फडकला आहे. या प्रसंगी जिल्हा सरचिटणीस डॉ. सचिन पाटील, जिल्हा परिषद सदस्य जयराज पाटील, शिराळा नगरपंचायत नगरसेवक केदार नलवडे, पंचायत समिती सदस्य समर्थ पाटील, सतीश पाटील, शंकर पाटील, शुभम महाडीक, इंद्रजीत पाटील, संग्राम गोइंगडे, रोहित देसाई, संदीप चारपले यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा

## सांगलीत ७ मे रोजी ‘शून्य सावली दिवस’ अनुभवण्याची संधी

**सांगली : हॅलो प्रभात**

माणसाची सावली कायम सोबत असते, मात्र गुरुवार, ७ मे रोजी सांगलीकरांना ‘शून्य सावली दिवस’ या अनोख्या खगोलीय घटनेचा अनुभव घेता येणार आहे. दुपारी १२ वाजून २८ मिनिटांनी सुमारे ५२ सेकंदांसाठी सूर्य बरोबर डोक्यावर येणार असून त्या क्षणी सावली पायाखाली येऊन अदृश्य होणार आहे, अशी माहिती डॉ. संतोष माने यांनी दिली.

पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशांनी कललेला असल्यामुळे सूर्याचा उत्तरायण व दक्षिणायन असा भासमान प्रवास होतो. याच खगोलीय स्थितीत कर्कवृत्त आणि मकरवृत्तादरम्यान असलेल्या भागात वर्षातून दोनदा सूर्य थेट माथ्यावर येतो. त्यावेळी उभ्या वस्तूंची सावली पूर्णपणे नाहीशी होते.




## सीपीआर रुग्णालयासाठी वाढीव निधीची गरज

### निधीसाठी विधिमंडळात लक्षवेधी : आ.राजेश क्षीरसागर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सीपीआर रुग्णालयातील रिक्त पदे, वाढीव निधी व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या मागणीसंदर्भात येत्या विधिमंडळ अधिवेशनात लक्षवेधी मांडणार असल्याची घोषणा आमदार राजेश क्षीरसागर यांनी केली. त्यांनी सोमवारी सीपीआर रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे आढावा बैठक घेत रुग्णसेवा व सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली.

२०१९ ते २०२१ दरम्यान कोरोनासह पूरस्थितीचा सामना करताना सीपीआर रुग्णालयाने दिलेली सेवा उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. कोल्हापूरसह सीमाभागातील गरजू रुग्ण मोठ्या विश्वासाने येथे उपचारासाठी येतात. वाढत्या रुग्णसंख्येमुळे सेवेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात,असे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे यांनी रुग्णालयातील कामकाजाचा आढावा सादर करताना अनेक पदे रिक्त असल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याचे सांगितले. तसेच औषधे, यंत्रसामुग्री दुरुस्ती व इतर गरजांसाठी वाढीव निधीची मागणी करण्यात आली.



यावेळी आ. क्षीरसागर यांनी रुग्णसेवेत कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट केले. पोर्टेबल एमआरआयसारखी अत्याधुनिक यंत्रणा लवकरच उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी सांगितले. अपघात विभागाचे काम गतीमान करण्याबरोबरच निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती, प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती बिले तातडीने वितरित करणे, तसेच ऑक्सिजन प्लांट पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. रुग्णालय परिसरातील विकासकामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, तसेच फेरीवाल्यांवर अन्याय होऊ देऊ नये, असेही त्यांनी प्रशासनाला बजावले.




# राजकारणात नवे समीकरण

## मित्रपक्षांतील स्पर्धा आणि काँग्रेसची घसरण

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे चित्र उभे राहत आहे, ते केवळ सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्षापुरते मर्यादित नाही; तर मित्रपक्षांतील अंतर्गत स्पर्धा आणि प्रभाव सिद्ध करण्याची धडपड अधिक तीव्र झालेली दिसते. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील सूक्ष्म तणाव आता उघडपणे जाणवू लागला आहे. या पार्श्वभूमीवर विरोधकांची विस्कळीत अवस्था अधिकच ठळक होत आहे. अलीकडील विधान परिषद निवडणुकीने या सर्व राजकीय प्रवाहांना अधोरेखित केले. दहा जागांपैकी सहा जागा जिंकत भाजपने आपली संघटनात्मक ताकद आणि निवडणूक व्यवस्थापन कौशल्य पुन्हा सिद्ध केले. दुसरीकडे काँग्रेस पक्ष मात्र निर्णयांतील गोंधळ, अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वातील कमकुवतपणामुळे सतत पिछाडीवर राहिल्याचे दिसून आले. उमेदवारी जाहीर करणे आणि शेवटच्या क्षणी माघार घेणे, ही पुनरावृत्ती पक्षाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. महाविकास आघाडीमध्येही समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसून आला. उद्धव ठाकरे यांचे नाव निश्चित झाल्यानंतर अचानक अंबादास दानवे यांचे नाव पुढे येणे, आणि त्यावर काँग्रेसची प्रारंभीची नाराजी–या घडामोडींनी विरोधकांतील अस्थिरता उघड केली. अखेरीस अटींसह पाठिंबा देण्याची भूमिका काँग्रेसला घ्यावी लागली, पण तोपर्यंत राजकीय नुकसान झालेलेच होते. या साऱ्या राजकीय पटावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची रणनीती विशेष लक्षवेधी ठरते. तिसरा उमेदवार देण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे विरोधकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि अप्रत्यक्षपणे भाजपचा मार्ग सुकर झाला. मात्र, हीच चाल मित्रपक्ष भाजपलाही सूचक इशारा देणारी ठरतेड्डकी शिंदे गट स्वतंत्र ताकद म्हणून उभा राहू इच्छित आहे. दरम्यान, प्रज्ञा सातव यांचा भाजपमध्ये प्रवेश आणि त्यांची बिनविरोध निवड ही काँग्रेससाठी आणखी एक धक्का ठरली. पक्षातून बाहेर पडणाऱ्या नेत्यांची संख्या वाढत असल्याने काँग्रेसमधील असंतोष आणि संघटनात्मक कमकुवतपणा अधोरेखित होतो. परिणामी विधान परिषदेत भाजपचे संख्याबळ अधिक मजबूत झाले आहे.काँग्रेसची स्थिती सध्या अत्यंत चिंताजनक आहे. विरोधी पक्षनेतेपदाची संधीही हातातून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केलेली भीती, की पक्षातील आमदार इतर पक्षांकडे वळू शकतात, आता हळूहळू वास्तवात उतरताना दिसते. दुसरीकडे, शिंदे गट आपली राजकीय व्याप्ती वाढवण्याच्या प्रयत्नात आहे. बच्चू कडू यांच्यासारख्या आक्रमक आणि जनाधार असलेल्या नेत्यांना जवळ करून विदर्भात आपले बळ वाढवण्याची रणनीती आखली जात आहे. या माध्यमातून स्थानिक पातळीवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. सत्ताधारी आघाडीतही सर्व काही सुरळीत नाही. नवी मुंबईत गणेश नाईक यांच्याशी मतभेद, मीरा–भाईंदरमध्ये नरेंद्र मेहता आणि प्रताप सरनाईक यांच्यातील संघर्ष, तसेच साताऱ्यात शंभूराज देसाई यांच्या आंदोलनातून निर्माण झालेली परिस्थिती, ही उदाहरणे सत्ताधाऱ्यांतील अंतर्गत तणाव अधोरेखित करतात. पश्चिम महाराष्ट्रातील पारंपरिक राजकीय समीकरणेही ढासळताना दिसत आहेत. एकेकाळी काँग्रेसचे बालेकिल्ले असलेले सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर येथे आता नव्या राजकीय शक्ती उदयास येत आहेत. पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरात यांसारख्या दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागणे, हा बदलत्या राजकीय वास्तवाचा ठोस पुरावा आहे.एकूणच, महाराष्ट्राचे राजकारण सध्या बहुआयामी संघर्षाच्या टप्प्यावर आहे. भाजप आपली पकड मजबूत करत असताना, शिंदे गट स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. विरोधक मात्र अंतर्गत विसंवादात अडकलेले दिसतात. आगामी काळात हेच समीकरण राज्याच्या राजकीय भविष्याची दिशा ठरवणार आहे.

# शिक्षण : जीवन बदलणारी सर्वात मोठी शक्ती

**दै. हॅलो प्रभात**

आजच्या आधुनिक युगात शिक्षणाची व्याख्या आणि त्याचे महत्त्व दोन्हीही मोठ्या प्रमाणात बदलले आहे. पूर्वी शिक्षण म्हणजे केवळ शाळा, पाठ्यपुस्तके आणि परीक्षा एवढ्यापुरते मर्यादित मानले जात होते. परंतु आज शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, व्यक्तिमत्त्व विकासाचे, विचारशक्ती वाढवण्याचे आणि आयुष्याला योग्य दिशा देण्याचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. शिक्षणामुळे माणूस केवळ साक्षर होत नाही, तर तो जागरूक, जबाबदार आणि संवेदनशील नागरिकही बनतो.

शिक्षण माणसाला विचार करायला शिकवते. योग्य आणि अयोग्य यामधील फरक ओळखण्याची क्षमता शिक्षणामुळेच विकसित होते. शिक्षणामुळे माणसाची मानसिकता व्यापक होते आणि तो समाजातील विविध प्रश्नांकडे तर्कशुद्ध दृष्टीने पाहू लागतो. त्यामुळे तो अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या प्रथा यांच्यापासून दूर राहतो. एक शिक्षित व्यक्ती स्वतःच्या हक्कांबद्दल जागरूक असते आणि इतरांच्या हक्कांचा सन्मानही करते.

पूर्वी शिक्षण हे फक्त पुस्तकांपुरते मर्यादित होते, परंतु आजच्या काळात शिक्षणाची सीमा खूपच विस्तृत झाली आहे. आज शाळा आणि महाविद्यालयांबरोबरच इंटरनेट, ऑनलाइन कोर्सेस, अनुभव, प्रवास आणि लोकांशी संवाद यामधूनही शिक्षण मिळते. विद्यार्थ्यांसाठी आज अनेक संधी उपलब्ध आहेत. तो केवळ वर्गात बसून शिक्षकांकडून शिकत नाही, तर जगभरातील माहितीचा अभ्यास करून स्वतःचे ज्ञान वाढवतो. नवीन कौशल्ये आत्मसात करतो आणि स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करतो. आजच्या काळात तंत्रज्ञानाने शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. मोबाईल, संगणक, डिजिटल क्लासरूम, ऑनलाइन शिक्षण



प्लॅट फॉर्म आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे शिक्षण अधिक सोपे, सुलभ आणि प्रभावी झाले आहे. ग्रामीण भागातही इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जगभरातील ज्ञान सहज उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षणातील असमानता काही प्रमाणात कमी झाली आहे. कोणत्याही ठिकाणाहून, कोणत्याही वेळी शिक्षण घेणे शक्य झाले आहे.

मात्र, शिक्षण म्हणजे फक्त परीक्षेत चांगले गुण मिळवणे नव्हे. अनेक विद्यार्थी उच्च गुण मिळवतात, परंतु जीवनातील अडचणींचा सामना करताना अपयशी ठरतात. खरे शिक्षण तेच असते जे आत्मविश्वास वाढवते, समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करते आणि कठीण प्रसंगातही खंबीरपणे उभे राहण्याची ताकद देते. शिक्षणामुळे माणूस जीवनातील चढ–उतारांना सामोरे जाण्याची तयारी ठेवतो. शिक्षणाचा खरा उपयोग तेव्हाच होतो जेव्हा ते समाजासाठी वापरले जाते. एक शिक्षित व्यक्ती केवळ स्वतःचे जीवन सुधारत नाही, तर आपल्या कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचाही विकास घडवते. डॉक्टर लोकांचे प्राण वाचवतात, शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतात, वैज्ञानिक नवीन शोध लावतात, शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करतात आणि उद्योजक रोजगारनिर्मिती करतात. प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे केवळ करिअर म्हणून पाहू नये, तर ते एक सतत चालणारी प्रक्रिया आहे हे समजून घ्यावे. शिक्षणाला कधीच अंत नसतो. आयुष्यभर माणूस काही ना काही शिकतच असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी नवीन गोष्टी शिकण्याची तयारी ठेवावी. यश एका दिवसात मिळत नाही; त्यासाठी सातत्य, मेहनत आणि संयम आवश्यक असतो. अपयश आले तरी त्यातून शिकून पुढे जाण्याची वृत्ती ठेवली पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व आणखी वाढले आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा तीव्र झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतरावर भर न देता कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन, तर्कशक्ती आणि सर्जनशीलता यांसारख्या गुणांचा विकास करणे आवश्यक आहे. हे गुण जीवनात यशस्वी होण्यासाठी खूप महत्त्वाचे ठरतात.

शिक्षण प्रत्येकाला समान संधी देणारे एक शक्तिशाली साधन आहे. गरीब असो किंवा श्रीमंत, गावातील असो किंवा शहरातील – शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येकजण आपले भविष्य घडवू शकतो. अनेक महान व्यक्तींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाच्या जोरावर यश मिळवले आहे. त्यामुळे शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे.शेवटी, शिक्षण म्हणजे फक्त पदवी किंवा प्रमाणपत्र नव्हे, तर विचारांची श्रीमंती आहे. शिक्षण माणसाला केवळ यशस्वी बनवत नाही, तर तो एक चांगला, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनवते. शिक्षणामुळे समाजात सकारात्मक बदल घडतात आणि राष्ट्र प्रगतीच्या मार्गावर जाते.

शिक्षण हे असे शस्त्र आहे, ज्याच्या मदतीने आपण जग बदलू शकतो, हे वाक्य आजही तितकेच सत्य आहे. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून आपण स्वतःचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकतो.

• डॉ.पूजा देशमुख
मुंबई



## ‘राजा शिवाजी’चा बॉक्स ऑफिसवर विक्रमी धडाका; ओपनिंग वीकेंडला ३७ कोटींची कमाई

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र दिनी प्रदर्शित झालेल्या ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठा ओपनिंग वीकेंड करणारा चित्रपट ठरला आहे. चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्या तीन दिवसांत तब्बल ३७ कोटी नेट कमाईची नोंद केली.




रितेश देशमुख दिग्दर्शित या चित्रपटाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, प्रभावी मांडणी, भव्य निर्मितीमूल्ये आणि भावनिक कथानकामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाला पसंती दिली आहे. अनेक ठिकाणी चित्रपटाचे शो हाऊसफुल्ल होत आहेत.

पहिल्या दिवशी चित्रपटाने १२.४० कोटींची कमाई केली. दुसऱ्या दिवशी ११.५० कोटींची कमाई झाली, तर रविवारी तब्बल १३.१० कोटींची कमाई करत चित्रपटाने विकेंडमधील सर्वोच्च कमाई नोंदवली.

चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीलाही देशभरातून चांगला प्रतिसाद मिळत असून, आगामी दिवसांतही चित्रपटाची कमाई वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## मिसिंग लिंकमुळे वाहतुकीतील अडथळा दूर


**पुणे : हॅलो प्रभात**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे वाहतुकीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला असून, यामुळे स्थावर मालमत्ता तसेच गोदाम व्यवस्थापन क्षेत्रासाठी नव्या वाढीच्या संधी निर्माण होणार असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

नाईट फ्रँक इंडियाचे संशोधन, सल्लागार सेवा, पायाभूत सुविधा आणि मूल्यांकन विभागाचे वरिष्ठ कार्यकारी संचालक गुलाम झिया यांनी सांगितले की, पुणे मिसिंग लिंकचे उद्घाटन हे देशातील सर्वाधिक वर्दळीच्या वाहतूक मार्गांपैकी एका मार्गाचे महत्त्वपूर्ण उन्नयन आहे.

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३ किलोमीटरचा

### स्थावर मालमत्ता आणि गोदाम व्यवस्थेला चालना



हा वळणमार्ग दीर्घकाळापासून असलेला वाहतुकीचा अडथळा दूर करत असून, प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार आहे.

धोकादायक घाट विभागातून वाहतूक वळवल्याने सुरक्षितता आणि कार्यक्षमता दोन्हीमध्ये सुधारणा होणार आहे. या प्रकल्पातील ‘टायगर व्हॅली’ परिसरातील देशातील सर्वात लांब आणि उंच दोरआधारित पूल हे विशेष आकर्षण ठरत आहे.

गुलाम झिया यांनी पुढे सांगितले की, अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा बाजाराच्या उत्क्रांतीसाठी महत्त्वपूर्ण प्रेरक शक्ती ठरतात. मुंबई आणि पुणे यांच्यातील सुधारलेली जोडणी या दोन शहरांतील आर्थिक एकात्मता अधिक मजबूत करेल. यामुळे या मार्गालगत निवासी आणि व्यावसायिक विकासासाठी नवीन संधी निर्माण होतील. गुंतवणुकीसाठी उपलब्ध क्षेत्राचा विस्तार होऊन खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल आणि नव्या विकासकेंद्रांचा उदय होईल.

गोदाम व्यवस्था आणि पुरवठा साखळी क्षेत्रालाही या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे. जलद आणि विश्वासार्ह वाहतुकीमुळे कार्यक्षमता वाढेल, परतीचा कालावधी कमी होईल आणि उच्च दर्जाच्या गोदामांच्या मागणीत वाढ होईल. यामुळे मोठ्या साठवण केंद्रांच्या विकासाला चालना मिळून ई–वाणिज्य, उत्पादन आणि तृतीय पक्ष पुरवठा साखळी सेवांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.

## महात्मा फुले व डॉ. आंबेडकरांमुळे महिलांना समान स्थान : राजकुमार हिवरकर-पाटील



**नातेपुते : हॅलो प्रभात**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त तसेच महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राजगड नॉलेज सिटीच्या प्रांगणात महिलांसाठी ५० टक्के सवलतीच्या दरात शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन लाभार्थी महिलांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना राजकुमार हिवरकर–पाटील म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी दोनशे वर्षांपूर्वी महिलांच्या शिक्षणाचा पाया रचला. पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन त्यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. तत्कालीन इंग्रज सरकारसमोर प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची भूमिका त्यांनी ठामपणे मांडली. स्त्री शिक्षणाच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांनीही खांद्याला खांदा लावून मोठे योगदान दिले. ते पुढे म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानत सामाजिक विषमता दूर करण्यासाठी संविधानाच्या माध्यमातून महिलांना समान हक्क बहाल केले. त्यामुळेच आज महिलांना समाजात समांतर स्थान प्राप्त झाले आहे.

कार्यक्रमात उपस्थित महिलांना प्रमाणपत्रांसह शिलाई मशीन सुपूर्द करण्यात आली. यावेळी राजकुमार हिवरकर–पाटील, प्राचार्या कुमारी झगडे, अमोल यादव, किशोर लोणारी, उपाध्यक्ष शैलेश जोशी, संचालक रोनक चंकेश्वरा आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## अंबुजा सिमेंट्सची विक्रमी कामगिरी; FY 26 मध्ये ७३.७ दशलक्ष टन विक्री

**अहमदाबाद : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क**

अंबुजा सिमेंट्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५–२६ आणि चौथ्या तिमाहीत दमदार कामगिरी नोंदवत विक्रमी विक्रीची नोंद केली आहे. कंपनीने FY26 मध्ये ७३.७ दशलक्ष टन सिमेंट विक्री करत आतापर्यंतची सर्वोच्च वार्षिक विक्री गाठली.

कंपनीचा एकूण महसूल ४०,६५६ कोटींवर पोहोचला असून EBITDA ६,५३९ कोटी नोंदवण्यात आला. हे मागील वर्षाच्या तुलनेत ३१ टक्के वाढ दर्शवते. चौथ्या तिमाहीतही कंपनीने १९.९ दशलक्ष टन विक्रीची नोंद केली. या कालावधीत महसूल १०,९१५ कोटी राहिला. प्रीमियम उत्पादनांची वाढती मागणी आणि मजबूत वितरण व्यवस्थेमुळे कंपनीला ही कामगिरी साध्य करता आली.

कंपनीने ‘वन सिमेंट प्लॅट फॉर्म’ अंतर्गत संघी आणि पेन्ना सिमेंटचे विलीनीकरण पूर्ण केले असून त्यामुळे कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. सध्या कंपनी कर्जमुक्त असून मजबूत आर्थिक स्थितीत आहे. हरित ऊर्जेचा वापर वाढवत कंपनीने चौथ्या तिमाहीत ३२ टक्के वापराचा टप्पा गाठला आहे. तसेच लॉजिस्टिक्स सुधारणा आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खर्च नियंत्रणात ठेवण्यात यश आले. FY26 मध्ये कंपनीची उत्पादन क्षमता 109 MTPA पर्यंत वाढली असून पुढील आर्थिक वर्षात ती 119 MTPA पर्यंत नेण्याचे नियोजन आहे.

## १६,२२३ ट्रॅक्टर विक्रीसह ३५.६% वाढ; सोनालिकाची दमदार सुरुवात

**पुणे : हॅलो प्रभात**

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल महिन्यात आजपर्यंतची सर्वाधिक एकूण १६,२२३ ट्रॅक्टरची विक्री करून आर्थिक वर्ष २०२७ च्या प्रवासाची जोरदार आणि धोरणात्मक सुरुवात केली आहे. या उद्योगातील बाजारपेठेचा सर्वाधिक




वाटा मिळविणाऱ्यांमध्ये तिने प्रमुख स्थान मिळवले आहे. यासाठी तिच्या स्तंभित करेल अशा ३५.६ % एकंदर वाढीची चालना मिळाली असून तिने उद्योगाच्या २७% (अंदाजे) वाढीच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे.

कंपनीची आपल्या ३० व्या वर्षात ’जीतने का दम’ मिळवून देण्याच्या शेतकरी–प्रथम तत्त्वज्ञानावर निर्भरता कायम असून अधिक शेतकरी कार्यक्षमता आणि उत्पन्न क्षमतेसाठी प्रगत कृषी–नवकल्पनांचा तिला आधार मिळाला आहे.

आपले उच्च गुणवत्तेचे ट्रॅक्टर सर्व प्रकारच्या वापरांमध्ये अखंडपणे कामगिरी करतील याची हमी ती देते. जगातील सर्वात मोठा इंटिग्रेटेड ट्रॅक्टर उत्पादक कारखाना आणि प्रगत संशोधन आणि विकास क्षमतांचे पाठबळ लाभलेला हा ब्रँड शक्तिशाली आणि भविष्यवेधी उत्पादनांसह भारतीय शेतीच्या परिवर्तनाचे नेतृत्व करत आहे.

## किया इंडियाकडून ‘डिजिटल पासपोर्ट’ लॉँच

**मुंबई : हॅलो प्रभात**

किया इंडिया या देशातील आघाडीच्या मास–प्रीमियम ऑटोमेकरने डिजिटल पासपोर्टच्या लॉँचची घोषणा केली. हे एक नाविन्यपूर्ण आणि ग्राहक–केंद्रित वैशिष्ट्य आहे, जे कार मालकीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.




किया कनेक्ट ॲपमधील ‘न्यू सर्व्हिसेस‘ टॅब अंतर्गत ग्राहकांना हा डिजिटल पासपोर्ट उपलब्ध होईल. हे वैशिष्ट्य ग्राहकांना वेईकल हेल्थचा सुरक्षित आणि डेटा–आधारित अहवाल प्रदान करते, ज्याद्वारे वाहनाच्या संपूर्ण कार्यकाळाची विश्वसनीय माहिती मिळते. ही सेवा तीन महिन्यांच्या सबस्क्रिप्शनसाठी ३९९ रूपये (अधिक लागू कर) या किमतीत उपलब्ध आहे. ग्राहक आता आपली वाहने हाताळताना आणि त्यांचे मूल्यमापन करताना वाढती पारदर्शकता, सोय व विश्वासाची मागणी करत आहेत. ही गरज ओळखून किया इंडियाच्या डिजिटल पासपोर्ट उपक्रमाचा विविध प्लॅटफॉर्मवर विखुरलेल्या वाहनांच्या माहितीचे एकत्रीकरण करण्याचा मनसुबा आहे. हे नवीन वैशिष्ट्य वाहनाची सर्व महत्त्वाची माहिती एकाच ठिकाणी, प्रमाणित आणि समजण्यास सोप्या अहवालात एकत्रित करते, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या वाहनाच्या स्थितीबद्दल सखोल आणि महत्त्वपूर्ण माहिती मिळते.

## हर्नियावर लवकर निदान आणि वेळेवर उपचार गरजेचे

**पुणे : हॅलो प्रभात**

हर्निया हा सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित राहणारा आजार असून, वेळेत उपचार न झाल्यास जीवनमानावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, लवकर निदान आणि वेळेवर उपचार केल्यास हर्नियाचे प्रभावी व्यवस्थापन शक्य होते.

हर्निया ही अवस्था तेव्हा निर्माण होते, जेव्हा शरीरातील एखादा अवयव किंवा ऊतक आसपासच्या स्नायूंच्या कमकुवत भागातून बाहेर सरकतो. जड वजन उचलणे, दीर्घकाळ खोकला, स्थूलता तसेच पूर्वी झालेल्या शस्त्रक्रिया यामुळे हा धोका वाढतो.

आकडेवारीनुसार, सुमारे २७ टक्के पुरुष आणि ३ टक्के महिलांना आयुष्यात कधी ना कधी इन्ग्वायनल हर्नियाचा त्रास होतो. तज्ज्ञांनी गुंतागुंत टाळण्यासाठी वेळेवर शस्त्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

हर्नियाची सुरुवात अनेकदा जांघेत, पोटात किंवा शस्त्रक्रिया झालेल्या भागाजवळ लहान



सूज दिसण्यापासून होते. ओढल्यासारखी भावना, सौम्य वेदना, बराच वेळ उभे राहिल्यानंतर दाब जाणवणे, पोटात जडपणा किंवा फुगल्यासारखे वाटणे ही त्याची सुरुवातीची लक्षणे आहेत.

डॉ. परमेश्वर भाम्ब्रूले यांनी सांगितले की, सुरुवातीला किरकोळ वाटणारी ही समस्या उपचार न घेतल्यास गंभीर होऊ शकते. मात्र, वेळेवर हस्तक्षेप केल्यास उपचार प्रक्रिया सोपी ठरते आणि रुग्णांना लवकर आराम मिळतो.

हर्नियाच्या उपचारपद्धतीत झालेल्या प्रगतीमुळे आता कमी वेदनादायी आणि कमी त्रासदायक शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. लहान चिरे देऊन केली जाणारी आधुनिक शस्त्रक्रिया, सर्जिकल जाळीचा वापर आणि कमी कालावधीत बरे होण्याची प्रक्रिया यामुळे रुग्ण लवकर पूर्ववत होऊ शकतात. डॉ. विनायक क्षीरसागर यांनी सांगितले की, हर्नियाचा उपचार हा केवळ सूज दूर करण्यापुरता मर्यादित नसून, भविष्यातील गुंतागुंत टाळणे आणि रुग्णाचे जीवनमान सुधारण्यासही महत्त्वाचा आहे.

तज्ज्ञांच्या मते, योग्य वजन राखणे, अतिताण टाळणे आणि सततचा खोकला असल्यास त्यावर उपचार करणे यामुळे हर्नियाचा धोका कमी होऊ शकतो. जागरूकता, लवकर निदान आणि वेळेवर उपचार हेच दीर्घकालीन आरोग्यासाठी महत्त्वाचे ठरतात.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : एस.९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at 946, GF-7, Gulmarg Appartment, Sarnaik Colony, Shivaji Peth, **kolhapur** **- Editor GANESH BANDA PATIL.**

■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **सांगली कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादिका : माहेश्वरी घोरपडे ■ संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपर्क : 9011889001

## बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी मंगळवारपासून अर्ज करण्याची सुविधा होणार उपलब्ध

**पुणे : हॅलो प्रभात** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जून-जुलैमध्ये होणाऱ्या बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा मंगळवार (ता. ५) उपलब्ध करून देण्यात येत आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज राज्य मंडळाच्या 'www.mahahsscboard.in' या संकेतस्थळावर भरता येणार आहेत. राज्य मंडळाने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल शनिवारी ऑनलाइनद्वारे जाहीर केला. राज्य मंडळातर्फे बारावीची पुरवणी परीक्षा जून-जुलैमध्ये घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी पुनर्परीक्षा, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, जून-जुलैमध्ये नावनोंदणी केलेले खासगी विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणारे, आयटीआय विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरायचे आहेत. फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची परीक्षेतील माहिती अर्जात ऑनलाइनद्वारे घेता येणार आहे. फेब्रुवारी-मार्च परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ आणि जून-जुलै २०२७ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहणार आहेत. नियमित व विलंब शुल्काने अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. अतिविलंब शुल्काने अर्ज भरण्याच्या तारखा लवकरच कळविण्यात येतील, असे राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी सांगितले आहे.

### थोडक्यात पण महत्वाचे



## इस्कॉन मिरज येथे श्री नरसिंह जयंतीनिमित्त महायज्ञ उत्साहात

**मिरज : हॅलो प्रभात**

हरे कृष्ण संस्था इस्कॉन मिरज यांच्या वतीने श्री श्री नरसिंह जयंती निमित्त श्री नरसिंह महायज्ञ मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न झाला. भगवान श्री नरसिंह देवांना प्रसन्न करण्यासाठी तसेच भक्तांच्या जीवनातील विघ्न दूर व्हावीत आणि जागतिक स्तरावरील महामारी, युद्ध यांसारख्या संकटांचा नाश व्हावा या उद्देशाने ३० एप्रिल २०२६ रोजी हा यज्ञ आयोजित करण्यात आला होता. या महायज्ञासाठी कोल्हापूर येथून पुरोहित म्हणून श्रीमान सचिसूत प्रभू यांनी यज्ञ विधी पार पाडले. या यज्ञात ३५ दांपत्यांनी सहभाग घेतला. मिरजेचे युवराज श्रीमंत पटवर्धन राजे तसेच संगीताताई खोत, विद्यमान नगरसेवक सागर वनखंडे, बसवेश्वर भैय्या सातपुते (माजी सभापती), श्रीमान महाडिक , श्रीमान मगदूम (इंजिनियर) व अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानंतर हरिनाम संकीर्तन व श्री नरसिंह आरती संपन्न झाली. त्यानंतर ४०० हून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इस्कॉन कमिटीतील नरेंद्र मापारी, विजय सिंधी, डॉ. दीपक इसापुरे, अतुल वायचळ, सुहास खोचगे, विजय रांजने तसेच इतर भक्तांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम भक्तिभावपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.




## कै. काळूरामशेठ शंकरराव कोलते प्रवेशद्वाराचे लोकार्पण उत्साहात

**वडगावशेरी : हॅलो प्रभात**

■ कोलते-जाचक- जगताप परिवारांनी जपली सामाजिक बांधिलकी

वाघोली येथील श्री क्षेत्र वाघेश्वर मंदिर परिसरात कै. काळूराम शेठ शंकरराव कोलते यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या 'वैकुंठ द्वार' प्रवेशद्वाराचा लोकार्पण सोहळा गुरुवारी (३० एप्रिल) सायंकाळी सहा वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. समस्त कोलते, जाचक, पवार, जगताप, चव्हाण आदी आप्तेष्ट परिवार तसेच4 ग्रामस्थ आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक रामभाऊ दाभाडे, रत्नमाला सातव, वाघेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र सातव पाटील, पुणे जिल्हा भाजपा सरचिटणीस संदीप सातव, हवेली तालुका भाजपा अध्यक्ष विजय जाचक, मांजरी खुर्द ग्रामपंचायत सदस्य सागर उंदरे पाटील तसेच आर्मी मेजर अभिजीत जगताप उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी कै. काळूराम कोलते यांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच प्रवेशद्वाराच्या उत्कृष्ट बांधकामाचे कौतुक करून भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांना चालना मिळावी, अशा सदिच्छा व्यक्त केल्या. या प्रवेशद्वाराची संकल्पना कोलते परिवाराचे नातू कल्पेश अनिलराव जाचक आणि चेतन जगताप यांची असून, त्यांच्या पुढाकारातून हे काम साकार झाले आहे.

# दुर्गंधीयुक्त पाण्याने भीमनगरकर हैराण

### समस्यांचे लवकरच निवारण करण्याचा अधिकाऱ्यांचा दावा



**पुणे : हॅलो प्रभात**

दूषितयुक्त पाण्यानंतर आता भीमनगर परिसरात होणाऱ्या अनियमित व दुर्गंधीयुक्त येणाऱ्या पिण्याच्या पाण्यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले असून येथे येणाऱ्या दुर्गंधीयुक्त पिण्याच्या पाण्याचे लवकरच निवारण करण्यात येणार असल्याचा दावा पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता रविंद्र पाडाळे यांनी केला आहे. विश्रांतवाडी -धानोरी मार्गावर गेल्या अनेक वर्षापासून भीमनगर ही झोपडपट्टी वसलेली असून या भागात राज्यासह परराज्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात स्थायिक झाल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे. येथील नागरिकांना विविध सुविधा मिळाव्यात या उद्देशाने पालिकेच्या पिण्याच्या पाण्यासह सुखसुविधा पुरविण्यात आल्या आहेत.त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून येत असतानाच पालिका पाणीपुरवठा अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे स्थानिक नागरिकांना दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत होता.त्यामुळे स्थानिकांकडून अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत शंका उपस्थित करून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. मात्र नागरिकांच्या समस्येची तात्काळ दखल स्थानिक लोकप्रतिनिधी अनिल उर्फ बॉबी टिंगरे यांनी घेऊन परिसराची पाहणी करून येथील दूषित होणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.पण दुरुस्तीला पंधरा दिवस उलटत नाही, तोच पुन्हा परिसरात अनियमित व दुर्गंधीयुक्त पाणी नागरिकांना मिळत असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.त्यामुळे याची तात्काळ नागरिकांनी पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता रविंद्र पाडळे यांच्याकडे तक्रार करताच पाडळे यांच्यासह शुभम घाटकर,सायली गडदे या पाणीपुरवठा विभाग अधिकाऱ्यांनी भीमनगर भागातील नागरिकांची भेट घेऊन असलेल्या समस्या तात्काळ सोडविण्याचा दावा केला आहे.यावेळी नगरसेविका अश्विनी राहुल भंडारे,संगीता संदिप दांगट यांनी देखील परिसरातील जलवाहिनीची पाहणी केली.

> **गेल्या अनेक दिवसापासून पिण्याच्या पाण्याच्या समस्येला नागरिकांना सामोरे जाण्याची वेळ येत आहे.त्यामुळे पालिका अधिकाऱ्यांनी यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.**
> **- जितेंद्र कराळेकर, भाजप, ओबीसी विभाग अध्यक्ष**

> **येथील नागरिकांना येणारे दुर्गंधीयुक्त पिण्याच्या पाण्याची समस्या लक्षात घेऊन यासंदर्भात पाणीपुरवठा विभाग अधिकाऱ्यांशी चर्चा करून असलेला प्रश्न तात्काळ सोडविण्याचा प्रयत्न करू.**
> **-अनिल उर्फ बॉबी टिंगरे,नगरसेवक**

> **भीमनगर परिसरात स्थानिक नागरिक राहत असले तरी पण येथील असणारी घरे ही जवळ-जवळ असल्याने या भागात काम करताना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे येथील मुख्य प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने पाणीपुरवठा विभागामार्फत मीटर बसविण्यात येणार आहेत.**
> **-रविंद्र पाडळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग**

# सिंघम रविंद्र कदम पुरस्काराने सन्मानित

**पुणे : हॅलो प्रभात**



### महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड पुरस्कार प्रदान

सिंघम या टोपणनावाने ओळखले जाणारे लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांना नुकतेच महाराष्ट्र बुक रेकॉर्ड या भव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शहरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राहण्यासाठी पोलिस आयुक्त कार्यालय अंतर्गत चार महिन्यापूर्वी शहरातील विविध भागात नव्याने पोलिस स्टेशन उभारण्यात आल्याने नागरिकात समाधान जरी व्यक्त करण्यात येत असले तरी पण विविध भागातील पोलिस स्टेशन अंतर्गत अद्याप देखील अवैध धंद्यासह गुन्हेगारी क्षेत्राने डोके वर काढले होते.मात्र येरवडा भागातील लक्ष्मीनगर येथील नव्याने उभारण्यात आलेल्या पोलिस स्टेशन येथे सिंघम या टोपणनावाने ओळखले जाणारे रविंद्र कदम यांनी कारभार स्वीकारताच त्यांनी अवैध दारू धंद्यासह गुन्हेगारांवर कारवाईची धडक मोहीम राबवून परिसरात एक प्रकारचा दरारा निर्माण केला आहे.

विशेष करून कदम यांनी गुन्हेगारांवर दरारा जरी निर्माण केला असला तरी पण समाजातील गोरगरीब व गरजवंत नागरिकांच्या मदतीला धावत आहेत.त्यामुळे खाकी वर्दीची कामकाज पाहत असतानाच ते करत असलेल्या समाजकार्यातून ते जनतेचे कैवारी बनून अनेकांना त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न करून काही दिवसापूर्वीच एका वयोवृद्ध आजींना त्यांचे हक्काचे तर एका रिक्षाचलकास समाजाच्या माध्यमातून कदम यांनी मदतीचा हात पुढे करून त्यांनी आपले समाजकार्य अखंडितपणे सुरू ठेवल्याने त्यांचे हे कार्य पाहून महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त येरवडा येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह या ठिकाणी येरवडा कारागृहाचे अधीक्षक श्यामकांत शेडगे,ग्रामीण विभागाचे अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे व परिमंडळ ७चे पोलिस उपायुक्त सोमय् मुंडे यांच्या हस्ते पोलिस निरीक्षक व सिंघम या टोपणनावाने परिचित असलेले रविंद्र कदम यांना महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड या भव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कदम यांना पुरस्कार मिळताच सभागृहात टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत करून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## जिजामाता विद्यालयाची उत्कृष्ट यशाची सुवर्ण नोंद

**पुरंदर : हॅलो प्रभात**

जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या विद्यालयाने इयत्ता बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विज्ञान व वाणिज्य शाखेतील शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली.





विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.विज्ञान शाखेत खैरे दिक्षा संपत हिने 88 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. टेकवडे उर्वशी शरद (72.33 टक्के) द्वितीय, तर विभाड साक्षी मोहन (71.17 टक्के) तृतीय ठरली. वाणिज्य शाखेत खळदकर तृप्ती गणेश हिने 89.67 टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. जगताप धनश्री पोपट (84.50 टक्के) हिने द्वितीय, तर गरुड चेतन नरसिंग (78.33 टक्के) तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेत माने ज्ञानेश्वरी मल्हारी हिने 82.17 टक्के गुणांसह अव्वल स्थान मिळवले. विद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त नंदकुमार सागर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, पुरंदर तालुक्याचा बारावीचा एकूण निकाल 92.06 टक्के लागला असून 2171 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## कुटुंबीयांची भेट घेत अमितेश कुमार यांनी दिला धीर

**पुणे : हॅलो प्रभात**

नसरापूर येथील चिमुरडीवरील अत्याचार व हत्येच्या संतापजनक प्रकरणानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळलेली असताना, पुणे पोलिसांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वतः पीडितेच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांना धीर दिला आणि न्याय मिळवून देण्याचा शब्द दिला. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज चिमुकलीच्या कुटुंबीयांची भेट घेऊन वडिलांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत, "आरोपीला फाशीची शिक्षा होईपर्यंत मी तुमच्या सोबत राहणार आहे. तुम्हाला कधीही काही सांगायचे असेल, मदत हवी असेल तर मी स्वतः तुमच्या घरी येईन," असे आश्वासन दिले. भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे रोजी साडेतीन वर्षीय चिमुरडीवर भिमराव कांबळे (६५) या आरोपीने लैंगिक अत्याचार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण राज्यात संतापाची भावना व्यक्त होत असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी जोर धरत आहे.

## राजारामबापू पाटील ललित कला अकादमीचे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर








**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

लोकनेते स्व. राजारामबापू पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान २०२६' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. राज्याचे माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या राजारामबापू पाटील ललित कला अकादमी (महाराष्ट्र राज्य) व शब्दगंध कवी मंडळ संघ, बेळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. हा पुरस्कार वितरण समारंभ शनिवार, दि. १६ मे रोजी सायंकाळी ५ वाजता बेळगाव येथील श्री. तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन येथे संपन्न होणार आहे. पुरस्कारांची घोषणा कवी प्रा. प्रदीप पाटील व प्राचार्य आर. डी. सावंत यांनी पत्रकार परिषदेत केली. 'जीवनगौरव सन्मान' डॉ. सुनीलकुमार लवटे (कोल्हापूर) यांना प्रदान करण्यात येणार असून, त्यांना १ लाख रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येईल. तसेच सिसिलिया कार्व्हालो (वसई), डॉ. विवेकानंद गोपाल (तंजावर), डॉ. सुरेंद्र दरेकर (अहिल्यानगर), प्रा. डॉ. रणधीर शिंदे (शिवाजी विद्यापीठ) यांना प्रत्येकी २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. अनंत कदम (कर्नाटक) यांना विशेष सन्मान पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रिया पार पडली. स्व. बापूंच्या विचारांचा प्रसार व ललित कलांचा विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# जावळीच्या जंगलात वनविभागाची मोठी कारवाई

## खैर लाकूड तस्करी प्रकरणी ९ जणावर कारवाई, ७ वाहने जप्त

**सातारा : हॅलो प्रभात**



जावळी तालुक्यातील वनक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध खैर वृक्षतोडीवर सातारा वनविभागाने कठोर कारवाई करत मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. एप्रिल २०२६ मध्ये राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत एकूण ६ गुन्हे नोंदवून ९ आरोपींवर कारवाई करणेत आली असून, १९.०७८ घनमीटर खैर लाकूड आणि ७ वाहने जप्त करण्यात आली आहेत. सांगवी परिसरात खैर वृक्षांची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर तोड होत असल्याच्या तक्रारी वनविभागाकडे येत होत्या. यानंतर उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्रपाल संदीप जोपळे यांनी विशेष पथक तयार करून नियोजनबद्ध कारवाई केली. सलग काही दिवस विविध ठिकाणी छापे टाकून ही कारवाई पार पडली.

जप्त करण्यात आलेल्या खैर लाकडाची अंदाजित किंमत सुमारे ३ लाख ७ हजार रुपये असून, वाहनांची किंमत १८ लाख ५० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले.कारवाईत टेम्पो, पिकअप, स्कॉर्पिओ, बोलेरो तसेच ट्रक अशा वाहनांचा समावेश आहे. यावरून या अवैध व्यवसायाची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट होते.

तपासादरम्यान ओझरे (भणंग) येथील सुनील मर्ढेकर हा या प्रकरणाचा प्रमुख सूत्रधार असल्याचे समोर आले आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये रायगड, रत्नागिरी आणि सातारा जिल्ह्यातील व्यक्तींचा समावेश असून, त्यांनी जंगलातील दुर्गम भागात जागा साफ करून नियोजनबद्ध पद्धतीने वृक्षतोड केल्याचे निष्पन्न झाले आहे. स्थानिक कामगार, वाहतूक व्यवस्था आणि विक्रीसाठी स्वतंत्र जाळे उभारून ही टोळी कार्यरत होती. वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, अलीकडील काळातील ही सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक असून, यामुळे खैर तस्करीला मोठा आळा बसण्याची अपेक्षा आहे. मात्र, या घटनेमुळे जावळीतील वनसंपदेवर वाढता ताणही अधोरेखित झाला आहे. खैर हा पर्यावरणीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा वृक्ष असून, मृदा धूप रोखणे, जैवविविधता टिकवणे आणि परिसंस्थेचे संतुलन राखण्यात त्याची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे अशा वृक्षांची अवैध तोड भविष्यातील पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान, जंगल परिसरात संशयास्पद हालचाली आढळल्यास नागरिकांनी त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

SIDDHAGIRI GURUKUL FOUNDATION'S
**SIDDHAGIRI NURSING INSTITUTE**
A/P : KANERI,TAL : KARVIR,DIST : KOLHAPUR 416234
PHONE NO : 7767011008 Email : siddhagirinursingcollege@gmail.com

**VACANCIES**

Applications are invite don plain paper along with all necessary copy of certificates, from the eligible candidate for the following posts. Qualification and Experience as per INC Delhi and MUHS Nashik, Norms and University Direction No.01/2017.

| Sr. No | Subject | Vacant Post | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Principal | Vice Principal | Professor | Associate Professor | Lecturer | Tutor |
| 1. | Any Subject | 1 | 1 | | | | |
| 2. | Medical Surgical Nursing | | | | 1 | 2 | |
| 3. | Community Health Nursing | | | 1 | 1 | 2 | |
| 4. | Pediatric Nursing | | | | 1 | 1 | |
| 5. | Midwifery / Obstetrics and Gynecology Nursing | | | 1 | | 1 | |
| 6. | Psychiatric Nursing | | | | | 1 | |
| 7. | Nursing Tutor | | | | | | (SC) - 1<br>(ST) – 1<br>(VJNT) – 2<br>(OBC) – 3<br>(EWS) – 1<br>(OPEN) – 3<br>(SEBC) - 2 |

Note: For detailed information about post, qualification and other terms and conditions please visit MUHS website. Last date of Application is 8th day of publication of this advertisement.

-SD-
**Principal**

-SD-
**Secretary**

## भुदरगड तालुक्यात बारावीचा ९२.७९ टक्के निकाल

**गारगोटी : हॅलो प्रभात**



भुदरगड तालुक्यात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा सरासरी निकाल ९२.७९ टक्के इतका लागला आहे. यंदा एकूण १७०८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी १५८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यात ७० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून ४३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ८८० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १९७ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कर्मवीर हिरे कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेची विद्यार्थीनी श्रेया विठ्ठल राजगिरे हिने ८९.१७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तसेच केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा करत फटाक्यांची आतषबाजी केली तसेच साखर-पेढे वाटप करून आनंद व्यक्त केला. निकालानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भेट घेऊन आभार मानले. तालुक्यातील विविध महाविद्यालयांचा निकालही उल्लेखनीय राहिला. डॉ. डी. वाय. पाटील कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज गारगोटी आणि कॅसल व्ह्यू अकॅडमी पाल यांचा निकाल शंभर टक्के लागला. तसेच विद्यावर्धिनी ज्युनिअर कॉलेज पालचाही शंभर टक्के निकाल लागला. आनंदराव आबिटकर ज्युनिअर कॉलेजने ९९.३० टक्के, परशराम बाळाजी पाटील विद्यालय मुदाळ ९९.६० टक्के, तर शाहू प्रबोधिनी कोनवडेने ९७.६७ टक्के निकाल नोंदविला.

याशिवाय वत्सलाताई पाटील गर्ल्स कॉलेज ९०.९० टक्के, मडिलगे हायस्कूल ८७.५० टक्के, तिरवडे ८१.०१ टक्के, मिणचे खुर्द ७८.३७ टक्के, पाटगाव ७५ टक्के तर कडगाव ७७.३५ टक्के निकाल लागला. तालुक्यात एकूण निकाल समाधानकारक लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ज्ञानरूपी संस्कारातून समाजात वेगळी ओळख निर्माण होते

**▶▶ पृथ्वीराज देशमुख**

**कडेपूर : हॅलो प्रभात**

ज्ञानदानाच्या माध्यमातून केलेले संस्कार समाजात दीर्घकाळ टिकणारी ओळख निर्माण करतात, असे प्रतिपादन माजी आमदार पृथ्वीराज देशमुख (बाबा) यांनी केले.

कडेगाव तालुक्यातील कडेपूर येथे सौ. नंदाताई नानासाहेब कांबळे, वरिष्ठ मुख्याध्यापिका जि. प. शाळा तडसर/शाळगाव यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात




ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, शिक्षक हे समाज घडविण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. चांगले नागरिक घडवून देशाला सक्षम करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. नंदाताई व नानासाहेब कांबळे यांनी विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार हेच त्यांच्या कुटुंबाची समाजात ओळख निर्माण करणारे ठरले असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी कडेगाव पंचायत समितीचे उपसभापती डॉ. विजय महाडिक, तडसर पंचायत समिती सदस्य पै. रणजित पवार, गट शिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चिमटे, उपशिक्षक प्रवीण इंगोले, शीतल लोखंडे, विस्तार अधिकारी सौ. राजक्का चव्हाण, कडेगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा रंजना लोखंडे, सुप्रिया करांडे, माजी सभापती मंगलताई क्षीरसागर, माजी पं. स. सदस्य प्रकाश गढळे तसेच गावचे नेतेजीराव यादव उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत नंदाताई कांबळे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. प्रास्ताविक हणुमंत भोसले यांनी केले तर आभार नानासाहेब कांबळे यांनी मानले. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची यशस्वी सांगता



**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

'बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठल तुकाराम'च्या गजरात व भव्यदिव्य अश्या पालखी मिरवणूकीने त्याचबरोबर हभप तुकाराम महाराज (शिरूर) यांच्या काल्याच्या किर्तनाने गर्जेवाडी (ता.कवठेमहांकाळ) येथील श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची यशस्वी सांगता करण्यात आली.यावेळी मोठ्या प्रमाणात भाविक भक्त उपस्थित होते. पारायणा दरम्याने विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

२५ एप्रिल ते १ मे या दरम्यान चाललेल्या या पारायण सोहळ्यात दररोज पहाटे ५ ते ६ काकडा, सकाळी ८ ते १२ व दुपारी ३ ते ५ ज्ञानेश्वरी वाचन, सायंकाळी ५ ते ६ प्रवचन,६ ते ७ हरीपाठ,रात्री ९ ते ११ कीर्तन व ११ ते पहाटे ५ जागर असे धार्मिक कार्यक्रम पार पडले.

सदर सोहळ्यादरम्यान हभप अर्जुन शिंगाडे, बाळकृष्ण पाटील, गुलाबराव शिंदे, आदीनाथ पवार, संपतराव जाधव, शिवाजीराव साळुंखे यांची प्रवचने तर हभप राहुल फडतरे, मोहन घोटीकर, सुभाष पाटील, धनाजी ओलेकर,अनिल डुबुले, हेमंत मराठे, शिवाजी साळुंखे, तुकाराम हजारे यांची दृतकाव्य किर्तने पार पडली.

सोहळ्याची सांगताही 'राम कृष्ण हरी' च्या गजरात गावातील प्रमुख मार्गावरून श्रीची पालखी मिरवणूक व दिंडी सोहळ्याने झाली यावेळी महीला व पुरुष वारकर्यांनी ठेक्यासह फुगडीचा आनंद लुटला.सदर दिंडी सोहळा पुन्हा कार्यक्रमास्थळी येऊन तिथे हभप तुकाराम हजारे (शिरुर) यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाच्या वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सदर सोहळ्यास व्यासपीठ चालक म्हणून हभप अर्जुन शिंगाडे (गर्जेवाडी ) यांनी काम पहिले तर मृदंगाची उत्कृष्ट साथ ही हभप श्रीधर माने व अरविंद सुतार यांची राहीली.त्याचबरोबर शेलेकरी हभप रोहित मोरे (नाशिक) व सोमनाथ ऐवळे हे राहीले.तसेच हरिपाठ साथ ही विठू माउली वारकरी शिक्षण संस्था दिघंची यांनी बजावली.

## पश्चिम बंगालमधील विजय हा देशातील प्रत्येक राष्ट्रवादी नागरिकाचा : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : हॅलो प्रभात**

पश्चिम बंगालमध्ये भाजपाला मिळालेला निर्विवाद विजय हा केवळ एका राज्याचा विजय नाही तर हा देशातील प्रत्येक राष्ट्रवादी नागरिकाचा विजय आहे. भारताच्या एकतेला, अखंडतेला आणि सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या घुसखोरांच्या विरोधातील हा विजय आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला. हा विजय ममता बॅनर्जीच्या काळात प्राण



गमावलेल्या भाजपा कार्यकर्त्यांना समर्पित आहे, असे श्री. फडणवीस म्हणाले.

विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरी येथे मिळालेल्या यशाबद्दल भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपा प्रदेश कार्यालयासमोर विजयोत्सव साजरा केला. यावेळी श्री. फडणवीस बोलत होते. ग्रामीण विकास मंत्री जयकुमार गोरे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, भाजपा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आदी उपस्थित होते.

# राजारामबापू पाटील सह. दूध संघात महाराष्ट्र दिन उत्साहात

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

येथील राजारामबापू पाटील सहकारी दूध संघाच्या कार्यस्थळी १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संघाचे चेअरमन संग्राम फडतरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना फडतरे यांनी कामगार हा संस्थेच्या प्रगतीचा कणा असल्याचे सांगितले. कर्मचाऱ्यांचे



योगदान संस्थेच्या यशात मोलाचे आहे,असे ते म्हणाले. तसेच लोकनेते राजारामबापू पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून उभारलेल्या विविध संस्थांमुळे वाळवा तालुक्यातील सर्वसामान्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली, असे त्यांनी नमूद केले.

आ.जयंतराव पाटील व युवा नेते प्रतिक पाटील यांचे मार्गदर्शन संस्थेला लाभत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी कामगार कल्याण मंडळ व दूध संघाच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवात आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उपस्थित सर्व कामगारांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास संचालक जगन्नाथ पाटील, कार्यकारी संचालक एस. डी. ढोपे, विभागप्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श इन्स्टिट्यूट येथे ६ दिवसीय सॉफ्ट स्किल प्रशिक्षण यशस्वी

**विटा : हॅलो प्रभात**

आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर, विटा येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आयोजित ६ दिवसीय सॉफ्ट स्किल व व्यावसायिक संवाद कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागामार्फत अ‍ॅपटेक सोल्युशन्स प्रा. लि. यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

या प्रशिक्षणात ३५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा दिवसांत दररोज १८ सत्रांप्रमाणे एकूण ११० सत्रे यशस्वीरित्या



पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्ये व उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रशिक्षणादरम्यान सॉफ्ट स्किल्स, ई-मेल लेखन शिष्टाचार, संवाद कौशल्ये, गणितीय व तार्किक क्षमता, सार्वजनिक संभाषण, बायोडाटा लेखन, व्यक्तिमत्त्व विकास, वेळ व्यवस्थापन, संघभावना, ताण-तणाव व्यवस्थापन आणि मुलाखत कौशल्ये यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. सर्व सत्रे प्रात्यक्षिक व सहभागात्मक पद्धतीने घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्यात व आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली असून भविष्यातील प्लेसमेंट प्रक्रियेसाठी त्यांना भक्कम पाया मिळाला आहे. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणास सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यक्रमासाठी टीपीओ प्रा.एस.एस.जाधव, प्राचार्य डॉ.पी.एस.पाटील व कॅम्पस डायरेक्टर कु. पूजा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. नियोजन विभागप्रमुख प्रा.एच.एस.भोरे व समन्वयक डॉ.आर.पी.निकम यांनी केले.

# घुणकीत गौतम बुद्धांची २५८८ वी जयंती साजरी

**घुणकी : सचिन कांबळे**

येथील सिद्धार्थ नगर मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्सव समिती यांच्यावतीने जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची २५८८ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जनसुराज्य शक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव कांबळे यांच्या हस्ते गौतम बुद्धांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. लोकनियुक्त सरपंच सौ सुजाता जाधव यांच्या हस्ते प्रतिमेच्या समोरचे दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी वारणा कारखान्याचे संचालक सुभाष जाधव यांच्या हस्ते जनसुराज्य शक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव कांबळे स्वागत करण्यात आले. देशभरात १ मे



कामगार दिन, महाराष्ट्र दिन तसेच गौतम बुद्ध यांच्या २५८८ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. या तिन्ही महत्त्वपूर्ण दिवसांच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य, समता आणि प्रगतीचा संदेश देण्यात आला. यावेळी १४ एप्डॉरिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती निमित 'भारतीय संविधान' या विषयावर घेण्यात आलेल्या बहुपर्ययायी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना जनसुराज्य पक्षाचे जिल्हाअध्यक्ष यांच्याकडून गिफ्ट देण्यात आले. निकाल पुढील प्रमाणे. खुला गटात संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक कु दीक्षा बाळासो कांबळे, कु अद्वयी सचिन कांबळे, कु देविका देवानंद कांबळे यांना देण्यात आला. उर्वरित सर्वांनी ही चांगले गुण प्राप्त केलेबाद्दल गिफ्ट देण्यात आले.

यावेळी शंकरराव कांबळे पुढे म्हणाले की, आज देशात युद्ध होत आहेत तर सर्वच देशाला आता युद्धाची गरज नसून बुद्धांची विचाराची गरज आहे. यावेळी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ सुजाता जाधव यांनी दीपप्रज्वलन केले व वारणा कारखान्याचे संचालक सुभाष जाधव, महात्मा फुले सूतगिरणीचे जनसंपर्क अधिकारी व ग्राम सदस्य रमेश पाटोळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष पत्रकार सचिन कांबळे, उपअध्यक्ष महेंद्र कांबळे, सचिव गौतम कांबळे, सुभाष कांबळे, विकास कांबळे, अजित पाटोळे, बबन पाटोळे, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# हॅण्डबॉल स्पर्धेत मदनभाऊ युवा मंच संघ विजयी

**सांगली : हॅलो प्रभात**

खेळाडू प्रोत्साहन हॅण्डबॉल स्पर्धेतील मुली गटात मदनभाऊ युवा मंच सांगली संघाने विजेतेपद पटकावले. विजेत्या संघास रोख रक्कम व कै. ताराबाई बाळासो चव्हाण चषक प्रदान करण्यात आला. बक्षीस वितरण हॅण्डबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीपकुमार चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमहापौर गजानन मगदूम, सेक्रेटरी प्रा. जहांगीर तांबोळी,



खजिनदार प्रा. हर्षकुमार पाचोरे, सौ. पूजा पाटील तसेच संयोजक स्वप्नील कदम, स्वप्नील मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रा. चव्हाण यांनी खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव करून राष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे, असे आवाहन केले. स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील मुलींना क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी मोठी संधी उपलब्ध होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. स्पर्धेत सहभागी संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. विजेत्या संघाचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## राजारामबापू कारखान्याच्या कार्यस्थळावर महाराष्ट्र दिन उत्साहात

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सखाराळे, वाटेगाव-सुरुल, कारंदवाडी व तिप्पेहळळी (जत) या युनिट कार्यस्थळांवर महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अनेक हुतात्म्यांच्या बलिदानातून १ मे रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली असून राज्याच्या प्रगतीसाठी व मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. सखाराळे येथे संचालक अतुल पाटील, वाटेगाव-सुरुल येथे अमरसिंह साळुंखे, कारंदवाडी येथे रघुनाथ जाधव, तर तिप्पेहळळी (जत) येथे विठ्ठल पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर



गीत सादर केले. यावेळी सुरक्षा रक्षकांनी मानवंदना दिली. विविध अधिकारी, खातेप्रमुख व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यात दा विंची रोबोटिक तंत्राने किडनी काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे : हॅलो प्रभात**

येथील रूबी हॉल क्लिनिकमध्ये एका ज्येष्ठ रुग्णावर प्रगत दा विंची सर्जिकल सिस्टीमच्या साहाय्याने रोबोटिक रेट्रोपेरिटोनियल नेफ्रेक्टॉमी यशस्वीरीत्या करण्यात आली. कार्यक्षम नसलेली किडनी काढण्यासाठी ही




शस्त्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पार पडली.

ही शस्त्रक्रिया वरिष्ठ मूत्ररोग तज्ज्ञ, प्रा. व विभागप्रमुख डॉ. राजीव चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तसेच वरिष्ठ मूत्ररोग तज्ज्ञ व रोबोटिक सर्जरी संचालक डॉ. हिमेश गांधी यांच्या सहकार्याने करण्यात आली. रुग्णाला ५ मार्च २०२६ रोजी दाखल करण्यात आले, ६ मार्च रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली आणि ९ मार्च रोजी डिस्चार्ज देण्यात आला.

या प्रक्रियेत पोटाच्या पोकळीत प्रवेश न करता थेट किडनीपर्यंत पोहोचणारी रेट्रोपेरिटोनियल पद्धत वापरण्यात आली. त्यामुळे रक्तस्राव कमी, वेदना कमी आणि गुंतागुंत टाळता आली. ३D व्हिज्युअलायझेशन व अचूक रोबोटिक उपकरणांमुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व प्रभावी ठरली.

डॉ.चौधरी यांनी सांगितले की, या तंत्रामुळे विशेषतः ज्येष्ठ रुग्णांमध्ये उत्तम परिणाम मिळतात. रुग्णाची प्रकृती लवकर सुधारली असून काही दिवसांतच त्यांनी दैनंदिन कामकाज सुरू केले.ही यशस्वी शस्त्रक्रिया मिनिमली इनव्हेसिव्ह उपचार पद्धतीतील महत्त्वपूर्ण प्रगती मानली जात असून, रूबी हॉल क्लिनिकच्या अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानातील वाटचालीला बळकटी देणारी ठरली आहे.

## दीप पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची चॉकलेट कारखान्याला भेट

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त दीप पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कुपवाड येथील स्वीट कन्फेक्शनरी प्रा. लि. या चॉकलेट कारखान्याला शैक्षणिक भेट देत उद्योगजगताचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या उपक्रमात इयत्ता १ ली ते १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना चॉकलेट तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. कोको बीन्सपासून तयार होणारी पावडर, दूध आणि साखर यांच्या मिश्रणातून स्वादिष्ट चॉकलेट कसे तयार



होते, याची सविस्तर माहिती तज्ज्ञांनी दिली.

तसेच उत्पादन, पॅकेजिंग आणि विपणन प्रक्रियेची माहितीही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. आधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचा वापर पाहून विद्यार्थ्यांनी उद्योगक्षेत्राबाबत उत्सुकता व्यक्त केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या चॉकलेटचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली, ज्यामुळे त्यांचा अनुभव अधिक आनंददायी ठरला.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राची प्रत्यक्ष ओळख झाली असून त्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडली. शाळेच्या प्राचार्य सौ. नमिता जैन व सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.